आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
१४ ऑगस्ट २०२६ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येनिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज देशवासीयांना संबोधित करणार

- स्वातंत्र्य दिनानिमित्त विविध विभागांमधल्या १ हजार ५७ कर्मचाऱ्यांना शौर्य आणि सेवा पदकं जाहीर

- यंदाच्या जनगणनेत नागरिकांना जात विचारली जाणार, सरकारकडून प्रश्नांची अधिसूचना जारी

**आणि**

- उत्तराखंडमध्ये जलविद्युत प्रकल्पाच्या बोगद्यात दरड कोसळल्यामुळे ७ जणांचा मृत्यू, १४ जण जखमी

<><><><>

स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येनिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज देशवासीयांना संबोधित करणार आहेत. आज संध्याकाळी ७ वाजता आकाशवाणी आणि दूरदर्शनवरुन हिंदी आणि इंग्रजीतून हा संदेश प्रसारित होईल. त्यामुळं आकाशवाणीवरचं संध्याकाळचं प्रादेशिक बातमीपत्र आज पावणे ७ वाजता प्रसारित होणार आहे. राष्ट्रपतींच्या या संदेशाचा प्रादेशिक भाषांमधला अनुवाद रात्री साडेनऊ वाजता आकाशवाणीवरून प्रसारित करण्यात येईल.

<><><><>

आज १४ ऑगस्ट. आजचा दिवस संपूर्ण देशात ‘फाळणी वेदना स्मृती दिन’ म्हणून पाळला जातो. आजच्या फाळणी वेदना स्मृती दिनानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी फाळणीच्या काळात जीव गमावलेल्या नागरिकांच्या स्मृतीला आदरांजली वाहत त्यांच्या धैर्याचे स्मरण केलं. आजच्या दिवशी देशाची फाळणी झाली. या फाळणीमुळे अनेकांची आयुष्य उद्ध्वस्त केली,अनेक कुटुंबे विस्थापित झाली, अनेकांनी त्यांचे आप्तेष्ट गमावले. असंख्य नागरिकांना मोठ्या यातना सहन कराव्या लागल्याचं प्रधानमंत्री मोदी यांनी समाज माध्यमावर लिहिलेल्या संदेशात म्हटलं आहे. या संकटावर मात करत अनेकांनी शून्यातून पुन्हा आपलं जीवन उभे केले. प्रतिकूल परिस्थितीचे यशात रूपांतर करत त्यांनी देशाच्या प्रगतीत मोठे

योगदान दिल्याचं प्रधानमंत्र्यांनी संदेशात नमूद केलं आहे. फाळणीच्या वेदना सोसलेल्या नागरिकांचा जीवनप्रवास मानवी जिद्द आणि सामर्थ्याची आठवण करून देतो. तसंच हा दिवस देशातील सौहार्द आणि बंधुभाव जपण्याचा संकल्प अधिक दृढ करो आणि विकसित भारताच्या उभारणीसाठी सर्वांनी एकजुटीने कार्य करावे, अशी अपेक्षाही त्यांनी संदेशातून व्यक्त केली. फाळणीच्या काळात प्राण गमावलेल्या तसंच अत्याचारांविरोधात संघर्ष करणाऱ्यांना गृहमंत्री अमित शहा आणि संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी आदरांजली वाहिली.

१४ ऑगस्ट १९४७ हा इतिहासातील अत्यंत क्रूर अध्याय होता. या काळात लाखो नागरिकांना आपले प्राण गमवावे लागले आणि अमानुष यातना सहन कराव्या लागल्या. कोट्यवधी नागरिकांना आपली घरे, संपत्ती आणि प्रियजनांना सोडून विस्थापित व्हावे लागले, असे शहा यांनी समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

हा दिवस भारताच्या फाळणीच्या त्या शोकांतिकेची आठवण करून देतो. घर, कुटुंबीय, संपत्ती गमावल्यानंतरही असंख्य नागरिकांनी पुन्हा आपले जीवन उभे करण्याचा निर्धार दाखवला. त्यांच्या संघर्ष, धैर्य, त्याग आणि जिद्दीचे स्मरण करण्याचा हा दिवस असल्याचे संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी समाज माध्यमावर लिहिलेल्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

स्वातंत्र्य दिनानिमित्त केंद्रीय गृह मंत्रालयाने पोलीस दल, अग्निशमन सेवा, होम गार्ड्स, नागरी संरक्षण आणि सुधार सेवा विभागातल्या एकूण ‘एक हजार ५७ कर्मचाऱ्यांना’ शौर्य आणि सेवा पदकं जाहीर केली आहेत. केंद्रीय गृह मंत्रालयानं आज एकूण ३०१ शौर्य पदकांची यादी जाहीर केली यात पोलीस दलातल्या २७२ पोलीस कर्मचारी आणि अग्निशमन सेवा विभागातल्या २९ कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. जीव आणि मालमत्तेचं रक्षण करणं, गुन्हे रोखणं किंवा गुन्हेगारांना पकडणं यासाठी उल्लेखनीय धैर्य दाखवल्याबद्दल शौर्य पदक दिलं जातं.

तसंच एकूण ९२ राष्ट्रपती पदकं जाहीर करण्यात आली असून यामध्ये पोलीस सेवेसाठी ८३, अग्निशमन सेवेसाठी ४, नागरी संरक्षण आणि होमगार्ड सेवेसाठी ३ आणि सुधार सेवा विभागासाठी २ पदकांचा समावेश आहे. यासह ‘उत्कृष्ट सेवेसाठी’ एकूण ६६४ जणांना पदकं जाहीर करण्यात आली असून यात पोलीस दलातल्या सेवेसाठी ६०६, अग्निशमन सेवेसाठी २८, नागरी संरक्षण आणि होमगार्ड सेवेतल्या १८ आणि सुधार सेवा विभागातल्या १२ कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.

पदकविजेत्यांमध्ये महाराष्ट्रातल्या ६० जणांचा समावेश आहे.

<><><><>

सध्या सुरू असलेल्या जनगणनेत विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांची यादी अधिसूचनेद्वारे देशाचे जनगणना आयुक्त आणि महा रजिस्ट्रार यांनी आज राजपत्रात प्रसिद्ध केली आहेत. त्यात नागरिकांना जात नोंदवण्याचा पर्याय उपलब्ध करून दिला आहे. २०११ मध्ये झालेल्या जनगणनेच्या वेळी केवळ अनुसूचित जाती आणि जमातीच्या नागरिकांना जात नोंदवण्याचा पर्याय उपलब्ध होता.

गेल्यावेळेच्या जनगणनेत एकूण २९ प्रश्न नागरिकांना विचारले गेले होते, यावेळी ही संख्या ४० झाली आहे.जनगणनेच्या दुसऱ्या टप्प्यात ही माहिती नागरिकांना विचारली जाईल. यात यंदा कोविड लस घेतल्याचे ठिकाण, एकूण बँक खात्यांची संख्या, मोबाईल, आधार, मतदान ओळखपत्र, पासपोर्ट आणि वाहन परवाना याचीही माहिती विचारली आहे.

<><><><>

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्यासंदर्भात केलेल्या मानहानीकारक वक्तव्यांप्रकरणी काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्याविरोधात दाखल झालेली मानहानीची तक्रार तसंच कनिष्ठ न्यायालयाने बजावलेलं समन्स सर्वोच्च न्यायालयानं आज रद्द केलं. या प्रकरणात आवश्यक मंजुरी घेतली नसल्याचं सांगत न्यायमूर्ती दीपांकर दत्ता आणि न्यायमूर्ती शील नागू यांच्या पीठाने हे आदेश दिले.

उत्तर प्रदेश सरकारनं दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रातही मंजुरीचा कोणताही उल्लेख नसल्याचं अतिरिक्त सॉलिसिटर जनरल आणि तक्रारदाराच्या वकिलांनी न्यायालयाच्या निदर्शनाला आणून दिलं. न्यायालयानं खंडपीठाने तक्रार आणि दंडाधिकाऱ्यांनी जारी केलेला आदेश रद्द केला. महाराष्ट्रातील अकोला जिल्ह्यात ‘भारत जोडो यात्रे’दरम्यान झालेल्या एका सभेत राहुल गांधी यांनी सावरकरांबाबत मानहानीकारक वक्तव्य केल्याचं सांगत त्यांच्याविरोधात तक्रार दाखल झाली होती.

<><><><>

उत्तराखंडमध्ये चमोली जिल्ह्यात पीपलकोटी इथं जलविद्युत परियोजना प्रकल्पाच्या निर्माणाधिन बोगद्यात भूस्खलन आणि पाण्याची गळती होऊन झालेल्या दुर्घटनेत ७ जणांचा

मृत्यू झाला तर १४ जण जखमी झाले आहेत. ही दुर्घटना काल संध्याकाळी घडली. या निर्माणाधिन बोगद्यात २२ कामगार होते. जखमींवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

दुर्घटनेची माहिती मिळताच पोलीस, राज्य आपत्ती प्रतिसाद दल, केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल तसंच अन्य बचाव यंत्रणा घटनास्थळी दाखल झाल्या. मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी या दुर्घटनेबद्दल चिंता व्यक्त केली असून, सर्व संबंधित यंत्रणांना युद्धपातळीवर मदत आणि बचावकार्य करण्याचे निर्देश दिले आहेत. मुख्यमंत्री पुष्करसिंह धामी यांनी घटनास्थळी भेट देऊन मदत आणि बचाव कार्याचा आढावा घेतला.

<><><><><>

झारखंडमध्ये कोडरमा जिल्ह्यात आज पहाटे भाविकांना घेऊन जाणाऱ्या बसची ट्रकला धडक बसल्यामुळे तिघांचा मृत्यू झाला तर १० जण जखमी झाले आहेत. मृत्युमुखी पडलेले तीनही जण नेपाळचे रहिवासी आहेत. नेपाळच्या रौतहट जिल्ह्यातल्या ४५ भाविकांना घेऊन जाणारी ही बस देवघर जिल्ह्यात बाबा वैद्यनाथ धाम आणि दुमका इथल्या बासुकीनाथ धामला भेट दिल्यानंतर मायदेशी परतत होती. वाटेत राजगीर मार्गावर असताना बस चालकाला डुलकी लागल्यानं ती महामार्गावर उभ्या असलेल्या ट्रकला मागून धडकली. मृतांमध्ये एका लहान मुलाचा समावेश आहे. जखमींना स्थानिक रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

<><><><><>

महाराष्ट्रात गडचिरोली जिल्ह्यात जपतलाई आश्रमशाळेमधल्या वसतिगृहात सर्पदंशामुळे झालेल्या तीन विद्यार्थिनींच्या मृत्युप्रकरणाची राष्ट्रीय मानवाधिकार आयोगानं स्वतःहून दखल घेतली आहे. या प्रकरणात राज्याच्या मुख्य सचिवांना आयोगानं नोटीस बजावली असून दोन आठवड्यांत सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. आश्रमशाळेत खाटांची कमतरता असल्यानं या विद्यार्थिनी जमिनीवर झोपल्या असताना त्यांना सर्पदंश झाला. तीन जखमी विद्यार्थिनींवर रुग्णालयात अद्याप उपचार सुरू आहेत.

<><><><><>

कोकण, मध्य महाराष्ट्र आणि गोवा इथं आज अति जोरदारपाऊस पडण्याची शक्यता भारतीय हवामान विभागानं व्यक्त केली आहे. तसंच छत्तीसगढला मुसळधार पावसाचा रेड अलर्ट हवामान विभागानं जारी केला आहे. तसंच गंगेच्या खोऱ्यातला पश्चिम बंगालचा भाग, हिमाचल प्रदेश, झारखंड, ओडिशा, आणि उत्तराखंड मध्येहे आज पावसाचा ऑरेंज अलर्ट

जारी करण्यात आला आहे. तमिळनाडू, पुद्दुचेरी आणि कराईकलमध्येही मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

**<><><><><>**

जपानच्या पूर्व भागात कालपासून संततधार पाऊस झाल्यामुळे पूरस्थिती निर्माण होऊन सहा जणांचा मृत्यू झाला आहे. टोकियोजवळच्या चिबा प्रांताला आज दिवसभरासाठी मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. चिबा आणि टोकियोच्या अनेक भागात मुसळधार पावसामुळे वाहतूक विस्कळीत झाली आहे.

**<><><><><>**

टोरंटो इथं काल रात्री झालेल्या ‘कॅनेडियन खुल्या टेनिस स्पर्धेत’ पोलंडच्या सातव्या मानांकित इगा श्वियातेक हिनं, दुसऱ्या मानांकित एलेना रायबाकिना हिचा ६-२, ६-३ असा सरळ सेट मध्ये पराभव करून महिला एकेरीचं विजेतेपद पटकावलं. श्वियातेकचं हे पहिलं विजेतेपद असून आता ती अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेसाठी सज्ज झाली आहे.

**//<><><><><>//**